# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०३/२०२५ (सोमवार)

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :—दिनांक ०९/०३/२५ रोजी अरोली पोलीस, हददीत रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की खडकी ते तोंडली रोड ने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खडकी ते तोंडली रोड येथे पेट्रोलींग केली असता एक संशयीत ट्रॅक्टर मुंडा कं एम.एच ३१ ए.जी ५४५१ त्याला जोडुन असलेली ट्रॉली क्रमांक एम.एच ३६ ए.एल ५२६५ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **अविनाश मनोहर मारवाडे ,वय २५ वर्षे, पत्ता. काठी,ता मोहाडी जि भंडारा** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.तसेच रेतीची वाहतुक ट्रॅक्टर मालक **सुरेंद्र रामप्रसाद चामट, वय ४६ वर्षे , पत्ता. काठी,ता मोहाडी जि भंडारा** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन **१)** १ ब्रास रेती ६००० रूपये , आणि **२)** ट्रॅक्टर मुंडा कं एम.एच ३१ ए.जी ५४५१ त्याला जोडुन असलेली ट्रॉली क्रमांक एम.एच ३६ ए.एल ५२६५ **किंमती ४,५०,००० /— रूपये असा एकुण ४,५६,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

ट्रॅक्टर चालक आरोपी नामे **अविनाश मनोहर मारवाडे ,वय २५ वर्षे, पत्ता. काठी,ता मोहाडी जि भंडारा आणि मालक आरोपी सुरेंद्र रामप्रसाद चामट, वय ४६ वर्षे , पत्ता. काठी,ता मोहाडी जि भंडारा याच्या** विरूध्द **कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण**

खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीतांवर कायदेशिर कार्यवाही**

**केळवद पोलीस यांची कारवाई**

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०९/०३/२०२५ रोजी केळवद पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती प्राप्त झाली की, पारधीबेडा तिडंगी येथे अैवधरित्या मोहाफुल गावठी दारू काढली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पारधी बेडा तिडंगी येथे धाड टाकली असता आरोपी नामे **१. संदिप दिलिप राजपुत, रा. पारधि बेडा**

**तिडंगी ता. कळमेश्वर, जि नागपुर** याचे ताब्यातून दोन प्लास्टीक ड्रम मध्ये मोहाफुल रसायन सडवा किंमती १४,०००/— रुपये तसेच दोन काळ्या रंगाचे रबरी टयुबमध्ये १०० लिटर मोहाफुल गावठी दारु किंमती १०,०००/—रुपये आणि इतर साहीत्य किंमती २४००/— रुपये **असा एकुण २६,४००/—रुपयांचा मुद्देमाल मिळून आला**. २. **आरोपी नामे अमित चंद्रपाल राजपुत,रा. पारधि बेडा तिडंगी ता. कळमेश्वर जि नागपुर** याचे ताब्यातुन प्लास्टीक ड्रम मध्ये मोहाफुल रसायन सडवा एकुण किंमती १४,०००/— रूपये , रबरी ट्युब मध्ये ३० लिटर गावठी दारु किंमती ३,०००/—रुपये आणि इतर साहीत्य २००० /— रूपये असा **एकुण १९,०००/—रुपयांचा मुद्देमाल मिळून आला**. ३. **आरोपी नामे अविनाश संजय पवार, रा. पारधि बेडा तिडंगी ता. कळमेश्वर जि नागपुर** याचे ताब्यातुन एका प्लास्टीक ड्रम मध्ये मोहाफुल रसायन सडवा प्रत्येकी एकुण किंमती ७०००/— रुपये तसेच दोन काळ्या रंगाचे रबरी ट्युब मध्ये १०० लिटर मोहाफुल गावठी किंमती १०,०००/—रु आणि इतर साहीत्य कि. १२००— रुपये अशा एकुण १८,२००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.तीन्ही आरोपी कडुन जप्त केलेला मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. **तिन्ही कारवाईमध्ये एकुण ६३,६०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल आहे. तिन्ही आरोपीविरुद्ध कलम कलम ६५ (ई) (फ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर